


Title Code- MAHMAR-51647

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com




वर्ष २ रे | अंक : ६९४. वा | गुरुवार | दि. २९ फेब्रुवारी २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# जिल्हा रुग्णालयातील अधिकारी नंबरी तर कर्मचारी दस नंबरी...

## माहिती देण्यास टाळाटाळ, माहिती अधिकाराचीही हेळसांड...

**जनसंचलन/ बुलढाणा**

येथील जिल्हा रुग्णालयात बोकाळलेला भ्रष्टाचार व अनागोंदी अवघ्या जगासमोर उघड करण्यासंदर्भात दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज सातत्याने प्रयत्न करीत असताना, रुग्णालयाच्या कामकाजासंदर्भात अनेक धक्कादायक माहिती आता समोर येऊ लागली आहे. जिल्हा रुग्णालयात सध्या जो काही गलथानपणा आणि भ्रष्टाचार वाढलेला आहे, त्यामुळे मोठ्या प्रमाणात प्रशासनाकडून प्रत्येक व्यवहारात गुप्तता पाळली जात आहे. म्हणूनच या ठिकाणी माहिती दडवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न होत आहेत. प्रसंगी माहिती अधिकार कायद्याचीही पायमल्ली येथे होताना दिसत आहे. जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या माध्यमातून खऱ्या अर्थाने सर्वसामान्य, गरीब व गरजू नागरिकांना चांगल्या व दर्जेदार आरोग्य सुविधा मिळणे अपेक्षित आहे. परंतु सध्या येथील जिल्हा सामान्य रुग्णालय हे भलत्याच गोष्टींसाठी कुप्रसिद्ध होत चालले आहे. जिल्हा रुग्णालयाच्या बेबंद आणि भ्रष्टाचारी कारभाराच्या संदर्भात सातत्याने दैनिक

### पोस्टमार्टम ६८

जनसंचलन व सिटी न्यूज पुढाकार घेऊन येथील कामकाज सुधारण्याचा प्रयत्न करीत आहे. परंतु जसजशी माहिती समोर येत आहे, तसतसा रुग्णालयात बोकाळलेला भ्रष्टाचाराचा भस्मासूर उघडा पडत चालला आहे. जिल्हा रुग्णालयात चालणारी टेंडरिंग प्रक्रिया, औषधी व उपकरणांचे होणारे खरेदी-विक्रीचे व्यवहार, विविध प्रकारची विकासकामे, अधिकाऱ्यांच्या बदल्या कर्मचारी भरती व जबाबदाऱ्या देण्याची प्रक्रिया या सर्वच विषयांबाबत प्रचंड गुप्ता पाळण्यात येत आहे. सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनला सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार या ठिकाणी चालणारी टेंडरिंग प्रक्रिया प्रचंड आक्षेपार्ह अशी आहे. लायकी नसलेल्या, पात्रता नसलेल्या लोकांना

**करोडो रुपयांचा भ्रष्टाचार करून जमवलेली संपत्ती/अपसंपदा व त्या कर्मचाऱ्याची पूर्व परिस्थिती व आजची परिस्थिचा उलगडा पुढील सत्रात**

टेंडर दिले जात आहे. त्यासाठी सर्व यंत्रणा व्यवस्थित मॅनेज केली जात आहे. जर अशा पद्धतीने टेंडरिंग झाले तर कोणतेही काम व्यवस्थित होणार नाही हे निश्चित आहे. यासंदर्भात माहिती घेण्याचा प्रयत्न केला असता, अक्षम्य टाळाटाळ केली जात आहे. अधिकारी एव्हढे निगरगट्ट, कोडगे आणि बेशरम झाले आहेत की, वारंवार माहितीची मागणी केली तरी अत्यंत बाष्कळ आणि खोटी कारणे देऊन माहिती देण्यास टाळाटाळ करीत असतात. माहिती अधिकार कायद्याची याठिकाणी प्रचंड पायमल्ली केली जात आहे. एव्हढी गुप्तता बाळगण्याचे एकच मुख्य कारण आहे आणि ते म्हणजे बेबंदपणे माजलेला भ्रष्टाचार. हा भ्रष्टाचार उघड होण्याची भीती असल्या कारणाने कोणीही माहिती देत




नाही. प्रत्येक अधिकारी दुसऱ्या अधिकाऱ्याकडे बोट दाखवून आपली कातडी वाचवण्याचा प्रयत्न करीत आहे. जिल्हा सामान्य रुग्णालयात विविध विभागांच्या जबाबदाऱ्या ज्या अधिकाऱ्यांवर दिलेल्या आहेत, त्यातही प्रचंड घोळ आहेत.

उर्वरित पान २ वर...



# विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी राहुल कासारे

जनसंचलन/बुलढाणा

विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा जयंती उत्सव हा बुलढाणा शहरात दरवर्षी मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात येतो. महात्मा जोतिराव फुले यांच्या जयंती पासून सुरु झालेला हा उत्सव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या दिवशी भव्य रॅलीत रूपांतरीत होऊन लाखोंच्या उपस्थितीत साजरा करण्यात येतो. या कार्यक्रमाच्या नियोजनाचीभूमिका ही सार्वजनिक जयंती उत्सव समिती पारपाडत असते.या वर्षीच्या बुलढाणा शहर सार्वजनिक जयंती उत्सवाच्या समिती अध्यक्षपदी राहुल कासारे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. राष्ट्रपिता महात्मा जोतीराव फुले व विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीची मंगळवार दि.२७ फेब्रुवारी २०२४ रोजी विश्राम भवन येथे नवीन अध्यक्ष निवडी बाबत बैठकीच्या आयोजित करण्यात आली होती. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी २०२३ चे अध्यक्ष अमोल खरे हे होते. सर्वप्रथम उत्सव समितीने आयोजित केलेल्या विविध सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचा लेखाजोखा प्रास्ताविकेतून समितीचे माजी अध्यक्ष कुणाल पैठणकर यांनी मांडला.



बैठकीचे अध्यक्ष अमोल खरे यांनी २०२३ मध्ये आयोजित केलेल्या वर्षभरातील विविध कार्यक्रमांचा आढावा व आयोजनात सहकार्याबद्दल सर्वांचे आभार व्यक्त केले.व या वर्षीचा नियोजनाचा प्रस्ताव या बैठकीत मांडला. नवनियुक्त अध्यक्ष राहूल कासारे यांनी या वर्षी जयंती ही नाविन्यपूर्ण व ऐतिहासिक करण्यासाठी समाज बाधवांनी सहकार्य करावे ही आशा व्यक्त केली. या वेळी माजी सभापती दिलीपभाऊ जाधव,प्रशांतजाधव,सुमित सरदार,निलेश गायकवाड,आशिष खरात,अशोक इंगळे,वैशालीताई ठाकरे,प्रतीक जाधव,अशोक दाभाडे यांनी आपले विचार व्यक्त केले.कार्यक्रमाचे संचालन गजानन गवई यांनी केले.या बैठकीस बुलढाणा शहरातील मोठ्या संख्येने तरुण वर्ग उपस्थित होता.

# पान१ वरुन जिल्हा रुग्णालयातील अधिकारी...

आरोग्य क्षेत्र हे अत्यंत संवेदनशील असे आहे. परंतु या ठिकाणी ज्यांच्यावर जबाबदाऱ्या आहेत, ते भलत्याच लोकांना आपल्या जागी बसवून दुसरीकडे कामे करीत आहेत. हा जनतेच्या आरोग्याशी चाललेला मोठा खेळ आहे. काही महिन्यांपूर्वी जिल्हा स्त्री रुग्णालयात एका महिलेच्या चुकीच्या ट्रीटमेंटमुळे त्या महिलेचा गर्भपात झाला. या ठिकाणीही अधिकाऱ्यांनी स्वतःवरची जबाबदारी कनिष्ठ व कंत्राटी कर्मचाऱ्यांवर झटकण्याचा केविलवाणा प्रकार केला आहे. हे प्रकार या ठिकाणी सर्रास होत आहेत. दुसरीकडे भांडार विभागापासून रोखपाल विभागापर्यंत सगळीकडे भ्रष्टाचाराने कहर माजवला आहे. कोट्यवधींचे भ्रष्टाचाराचे आकडे अनेक लोकप्रतिनिधी व विविध सामाजिक संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी बाहेर काढले आहेत. दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज द्वारा करण्यात आलेल्या तपासात असे दिसून आले आहे की, या ठिकाणी गेल्या काही वर्षांमध्ये २०० कोटींपेक्षा जास्त गैरव्यवहार झालेले आहेत. जिल्हा रुग्णालयाचे माजी रोखपाल पी. के. माळी असो की विद्यमान रोखपाल आर एस लाकडे, या सर्वांनी कॅशबुकात खाडाखोड करणे, नियमबाह्य अव्वाच्या सव्वा बिले काढणे, असे प्रकार करून भ्रष्टाचाराला खतपाण घातले आहे. या भ्रष्टाचाराकडे जिल्हा शल्यचिकित्सक असो की दुसरे कोणी वैद्यकीय अधीक्षक सगळेजण एक तर डोळेझाक करीत आहेत किंवा थेट या भ्रष्टाचारातच सामिल झालेले आहेत.

या सर्व गैरव्यवहारात अगदी खालपासून वरपर्यंत अधिकारी व कर्मचारी सामिल आहेत. अधिकारी नंबरी तर कर्मचारी दस नंबरी अशी स्थिती आहे. अधिकाऱ्यांचे नियंत्रण नसल्यामुळे कर्मचारी देखील निर्ढावले असून, तेही मस्तवाल झालेले आहेत. अधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचाराचा, दुर्लक्षितपणाचा फायदा कर्मचारी घेऊ लागले आहेत. चुकीच्या लोकांना टेंडर दिल्या गेल्याने भविष्यात या रुग्णालयाचे वाटोळे झाल्याशिवाय राहणार नाही. सर्वसामान्य नागरिकांचे आरोग्य सांभाळायचे असेल तर जिल्हा रुग्णालयात बोकाळलेला भ्रष्टाचार निपटून काढणे गरजेचे आहे. मात्र, भ्रष्टाचाराची साखळी आता इतकी मजबूत बनली आहे की, त्यासाठी फार मोठी सर्जरी जिल्हा रुग्णालयाच्या व्यवस्थेवर करावी लागणार आहे. भ्रष्टाचाराने संपूर्ण यंत्रणा पोखरली गेली असून, यंत्रणेच्या नसानसात भ्रष्टाचाराचे विष पसरले आहे. यासंदर्भात दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजने सातत्याने उपसंचालक व जिल्हाधिकाऱ्यांना कारवाईचे आवाहन केलेले आहे. कारण यंत्रणेतील सर्वच भ्रष्टाचाराच्या तुंबलेल्या गटारात लोळत असल्यामुळे रुग्णालय प्रशासनाकडून कोणतीही कारवाई अपेक्षित नाही. मात्र जिल्हाधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. त्या दृष्टीने दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज पाठपुरावा करीत आहे व करीत राहणार आहे. जोपर्यंत या ठिकाणी बोकाळलेला भ्रष्टाचार निपटून काढला जात नाही, तोपर्यंत ही निकराचे प्रयत्न आमचे सुरूच राहतील.

अजून बरेच काही पुढील भागात...

# नुकसानग्रस्तांना भरघोस मदत द्या- जयश्रीताई शेळके

## विरोधी पक्षनेता विजय वडेट्टीवार यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी

जनसंचलन/ बुलढाणा

जिल्ह्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरघोस मदत देऊन पाठबळ द्यावे, अशी मागणी काँग्रेसच्या प्रदेश सचिव जयश्रीताई शेळके यांनी २८ फेब्रुवारी रोजी विधानसभेचे विरोधी पक्षनेता विजय वडेट्टीवार यांच्याकडे केली. जिल्ह्यात २६ व २७ फेब्रुवारी रोजी अवकाळी पाऊस, गारपीट, वादळी वाऱ्याने थैमान घातले. यामध्ये २६ हजार ७६८ हेक्टरवरील पिकांचे मोठे नुकसान झाले. गहू, हरभरा, मका, कांदा, पानमळे, भाजीपाला, फळपीकांना फटका बसला. जिल्ह्यातील २५९ गावांमधील ३१ हजार ५१० शेतकरी नुकसानाच्या कचाट्यात सापडल्याचा प्राथमिक अहवाल कृषी विभागाने जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर केला आहे. जिल्ह्यातील संग्रामपूर, जळगाव जामोद, खामगाव, नांदुरा, सिंदखेड राजा, बुलढाणा, लोणार, देऊळगाव राजा या आठ तालुक्यांना अवकाळीचा फटका बसला आहे. सर्वात जास्त नुकसान संग्रामपूर तालुक्यात झाले आहे. ८ हजार ८९२ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले. गहू, हरभरा, कांदा, भाजीपाला, संत्रा आणि फळबागांचे नुकसान झाले. एकट्या संग्रामपूर तालुक्यात तब्बल १५ हजार ३२२ शेतकऱ्यांना अवकाळीचा तडाखा बसला. जळगाव जामोदमधील ४ हजार ४८८ शेतकऱ्यांना फटका बसला असून ३ हजार ७९१ हेक्टरवरील पिकांना झळ पोहचली. खामगाव ५१२ शेतकऱ्यांचे ३८७ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले. नांदुरा तालुक्यात १ हजार २०० हेक्टरवरील पिकांना फटका बसला असून २ हजार ३५० शेतकऱ्यांच्या स्वप्नांचा अवकाळीने चुराडा केला. मातृतीर्थ सिंदखेड राजा तालुक्यातील २ हजार ९१८ शेतकऱ्यांच्या २ हजार १०४ हेक्टरवरील पिकांची नासाडी झाली. जिल्ह्याचे ठिकाण बुलढाणा सुद्धा अवकाळीच्या तडाख्यात सापडले असून ३ हजार ४०० शेतकऱ्यांचे २ हजार १९० हेक्टरवरील पिकांचे अतोनात नुकसान झाले. लोणार तालुक्यात ९६० शेतकऱ्यांच्या ८९० हेक्टर क्षेत्रावरील पिकांची धूळधाण झाली. देऊळगाव राजा तालुक्यातील १ हजार ५७० शेतकऱ्यांच्या २ हजार ३१४



हेक्टरवरील रब्बी पिके भुईसपाट झाली आहेत. जिल्ह्यातील शेडनेटधारक शेतकऱ्यांना सुद्धा या अवकाळी पावसाचा तडाखा बसला आहे. अवकाळी पाऊस, गारपीट आणि वादळी वाऱ्याने पिकांचे तर नुकसान झालेच मात्र अनेक ठिकाणे झाडे कोलमडली. त्यामुळे रहदारीस अडथळा निर्माण झाला. विजेचे खांब पडल्याने वीज पुरवठा खंडित झाला होता. शेतकऱ्यांवर एकामागून एक संकटे कोसळत आहेत. सरकारने केवळ घोषणा करुन जमणार नाही. शेतकऱ्यांचे अश्रू पुसण्यासाठी त्यांना ठोस मदत घ्यावी लागेल. खरं तर झालेले नुकसान खुप मोठे आहे. त्याहून शेतकऱ्यांचे दुःख खूप मोठे आहे. कितीही मदत जाहीर केली तरी थोडकीच पडेल, असे जयश्रीताई शेळके यांनी निवेदनात नमूद केले आहे.

SAGMAL EDUCATION AND MULTIPURPOSE SOCIETY DUDHA

**MAHATMA GANDHI MAHAVIDYALAYA(MAHILA) DUDHA (PROPOSED)**

Address - At Post Dudha Tq. Buldana Dist. Buldana Pin code- 443106 Phone No. 9823661134

Email : ganeshkad86@gmail.com

Application are invited for the following vacancies of full time Principal,Librarian and Assistant Professor In The **Mahatma Gandhi Mahavidyalaya(Mahila) Dudha (Proposed)**

**(Permanent Non-Granted Basis)**

Employment Notice

| Sr. No. | Post | Subject | No of Post | Nature of Post | Category |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Principal | -- | 01 | Full time | Open |
| 2 | Librarian | -- | 01 | Full time | Open |
| 3 | Physical Education Teacher | -- | 01 | Full time | Open |
| **1) Course Name : B.Sc (Home Science)** | | | | | |
| 4 | Assistant Professor | English | 01 | Full time | Open |
| 5 | Assistant Professor | Consumer Studies | 01 | Full time | Open |
| 6 | Assistant Professor | Food Science And Sensory Evaluation | 01 | Full time | Open |
| 7 | Assistant Professor | Organic And Inorganic Chemistry | 01 | Full time | Open |
| 8 | Assistant Professor | Post Harvest Technology | 01 | Full time | Open |
| 9 | Assistant Professor | Food Microbiology | 01 | Full time | Open |
| 10 | Assistant Professor | Fashion Merchandising And Marketing | 01 | Full time | Open |
| **2) Course Name : Bachelor of Commerce** | | | | | |
| 12 | Assistant Professor | Business Economics | 01 | Full time | Open |
| 13 | Assistant Professor | Principles of Management | 01 | Full time | Open |
| 14 | Assistant Professor | Accountancy-Financial Accounting | 01 | Full time | Open |
| 15 | Assistant Professor | Business Mathematics | 01 | Full time | Open |
| 16 | Assistant Professor | Networking and Internet | 01 | Full time | Open |

**Qualification** – As Per UGC, Government of Maharashtra and Shreemati Nathibai Damodar Thackersey Women's University.

- Qualification, Services Conditions and Pay Scale will be as per the existing rules of the Govt. of Maharashtra, U.G.C. and Shreemati Nathibai Damodar Thackersey Women's University.
- The post will be filled subject to the availability of actual workload for each subject.
- Eligible candidate should send the application with enclosures of educational qualification certificate to reach the President Ganesh Kad Sagmal Education & Multipurpose Society Dudha Tq + Dist Buldana 443106) , on or before dated 10/03/2024
- Preference will be given to Differently-abled (Physically and Visually) as per Govt. rules

President
Sagmal Education And
Multipurpose Society Dudha

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# पुन्हा केवळ घोषणाच; भवितव्य मात्र अधांतरी खामगाव - जालना रेल्वेमार्गाबाबत रेल्वे लोकआंदोलन समितीची प्रतिक्रिया...

जनसंचलन/ चिखली

विधिमंडळात काल सादर झालेल्या अंतरीम अर्थसंकल्पात अजितदादा पवार यांनी खामगाव - जालना रेल्वेमार्गासाठी ५० टक्के आर्थिक सहभाग राज्य सरकार देईल ही केवळ घोषणाच आहे, गेल्या वर्षीच्या अर्थसंकल्पात देखील तत्कालीन अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अशीच घोषणा केली होती. मात्र, वर्षभरात त्यावर मुळीच अंमलबजावणी झाली नाही. असाच प्रकार पुन्हा घडू नये असे अशी अपेक्षा रेल्वे लोकांदोलन समितीने व्यक्त केली आहे. या रेल्वेमार्गाला ५० टक्के राज्य हिस्सा मंजूर करेपर्यंत खामगाव - जालना रेल्वेमार्गाचे भवितव्य अधांतरीच आहे अशी प्रतिक्रिया रेल्वे लोकआंदोलन समितीतर्फे नोंदवण्यात आली आहे. तब्बल ११४ वर्षापासून बुलढाणा जिल्ह्यातील जनता खामगाव - जालना रेल्वेमार्गाची प्रतीक्षा करत आहे. रेल्वे लोकआंदोलन समिती देखील या संदर्भात मागील १७ वर्षापासून शासनाकडे हे मागणी लावून धरत आहे. या मागणीकडे शासनाचे लक्ष वेधावे या उद्देशाने १२ जानेवारीपासून चिखली तहसील कार्यालयासमोर समितीच्या वतीने सत्याग्रह साखळी व उपोषण सुरू करण्यात आले होते. ४२ दिवस चाललेल्या या उपोषणाचा समारोप आ. श्वेताताई महाले यांच्या आश्वासनाने झाला. लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागण्यापूर्वी राज्य शासन खामगाव - जालना रेल्वेमार्गासाठी ५० टक्के निधी मंजूर करेल असे ठोस आश्वासन आ. महाले यांनी दिले होते. मात्र काल सादर झालेल्या अंतरीम अर्थसंकल्पात या आश्वासनाची पूर्तता मात्र झाली नाही केवळ जुन्याच आश्वासनाची पुनरावृत्ती झाली असल्याचा अभिप्राय रेल्वे लोकआंदोलन समितीने व्यक्त केला आहे.



### लोकांनी संभ्रमात राहू नये; रेल्वेमार्गाला अद्याप निधी मंजूर नाही...

अर्थसंकल्प सादर करताना उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजितदादा पवार यांनी खामगाव जालना रेल्वे मार्गासाठी राज्य शासन ५० टक्के आर्थिक सहभाग देईल असे वाक्य उद्गारले आहे यातून अद्याप राज्य शासनाने ५० टक्के निधी दिला नाही किंवा मंजूर केला नाही हेच स्पष्टपणे दिसते. याउलट जालना - जळगाव, नांदेड - बिदर व इतर रेल्वेमार्गासाठी प्रकल्प किमतीच्या ५० टक्के आर्थिक सहभाग देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे असे ठोस प्रतिपादन अजितदादा पवार यांनी केले. याचा अर्थ म्हणजे वरील दोन्ही रेल्वे मार्गांना ५० टक्के निधी राज्य शासनाने मंजूर केला असून खामगाव - जालना रेल्वेमार्गाला निधी देण्याचे केवळ आश्वासन मिळाले आहे. आपल्या जिल्ह्यातील खामगाव - जालना रेल्वेमार्गाला मंजुरी मिळाल्याचे, निधी मंजूर झाल्याचे जे चित्र रंगवले जात आहे, दाखवले जात आहे त्या चित्राकडे पाहून जिल्ह्यातील जनतेने संभ्रमात राहू नये, आपल्याला अद्यापही न्याय मिळाला नाही असे स्पष्टीकरण रेल्वे लोकआंदोलन समितीने केले आहे.

### तर पुन्हा आंदोलनाचा पवित्र घ्यावा लागेल - रेल्वे लोकआंदोलन समिती

खामगाव जालना रेल्वेमार्गासाठी राज्य शासनाने मंत्रिमंडळाच्या बैठकीत ५० टक्के निधी मंजूर करावा, तसे पत्र केंद्रीय रेल्वे बोर्डाला पाठवावे व शासन आदेश काढावा ही रेल्वे लोकआंदोलन समितीची प्रमुख मागणी आहे. यासाठीच आम्ही सत्याग्रह सुरू केला होता, मात्र ही मागणी अद्यापही पूर्ण झाली नसल्याचे रेल्वे लोकआंदोलन समितीने स्पष्ट केले आहे. जिल्ह्यातील जनतेसमोर खोटे चित्र रंगवण्यापेक्षा लोकप्रतिनिधींनी मंत्रालयातील फाईल तातडीने हलवावी व मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांकडे या रेल्वेमार्गासाठी ५० टक्के निधी मंजूर करवून घ्यावा अशी अपेक्षा समितीने व्यक्त केली आहे. जोपर्यंत राज्य शासन आपल्या मागणीची पूर्तता करत नाही; तोपर्यंत या खामगाव - जालना रेल्वेमार्गाचे भविष्य अधांतरीत आहे, असे सांगतानाच लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागण्यापूर्वी जर या रेल्वेमार्गाला ५० टक्के निधी मंजूर केल्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला नाही तर पुन्हा आंदोलनाचा पवित्रा घ्यावा लागेल असा इशारा रेल्वे लोकआंदोलन समितीने राज्य शासनाला दिला आहे.

# राजर्षी शाहू परिवार आणि वन बुलडाणा मिशनच्या वतीने रक्तदानाचा महायज्ञ!

जनसंचलन/बुलडाणा






राजर्षी शाहू परिवाराचे अध्यक्ष तथा वन बुलडाणा मिशन या जिल्ह्याच्या विकासाच्या राजकीय लोक चळवळीचे संकल्पक संदीप शेळके यांचा वाढदिवस दरवर्षी विविध लोकोपयोगी उपक्रमांनी साजरा होत असतो. गेल्या वर्षी ३ हजार पेक्षा अधिक बॅग रक्त संकलन केल्याच्या रेकॉर्डची नोंद झाली होती. दरम्यान यंदा हा रेकॉर्ड तुटण्याच्या उंबरठ्यावर असून आतापर्यंत २५०० बॅग रक्त संकलन झाले आहे. २५ जानेवारी २०२४ पासून राजर्षी शाहू परिवार तथा टीम वन बुलडाणा मिशनने रक्तदानाच्या महायज्ञाला सुरुवात केली होती. या उपक्रमाला जिल्हाभरात जोरदार प्रतिसाद मिळत आहे. १३ मार्च रोजी संदीप शेळके यांचा वाढदिवस आहे. त्यानिमित्ताने जिल्हाभरातील प्रमुख ठिकाणांसह जिल्ह्याबाहेरील देखील रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे. २५ जानेवारीपासून तर २८ फेब्रुवारीपर्यंत ५१ ठिकाणी रक्तदानाचा महायज्ञ आयोजित करण्यात आला होता, त्यात २५०० जणांनी रक्तदान केले आहे. १३ मार्च पर्यंत आणखी बऱ्याच ठिकाणचे कार्यक्रम होणार असल्याने यंदा ३००० बॅग पेक्षा अधिक रक्तसंकलन होऊन गेल्यावर्षीचा रेकॉर्ड तुटणार असल्याचा विश्वास आयोजकांना आहे. जिल्ह्याच्या मागासलेपणाचा कलंक दूर करण्यासाठी संदीप शेळके यांनी राजकीय परिवर्तनाची लढाई सुरू केली आहे. जिल्हावासियांच्या सुख-दुःखात संदीप शेळके कायम अग्रभागी असतात. जिल्ह्याच्या आरोग्यविषयक समस्यांची त्यांना चांगली जाण आहे. दररोज अनेक रुग्णांचे, रुग्णांच्या नातेवाईकांचे फोन संदीप शेळके यांना येतात. अशावेळी तातडीने आवश्यक ती मदत संदीप शेळके यांच्याकडून संबंधित रुग्णांना होते. बहुतांश फोन हे रक्तासाठी असतात. रक्तदानाच्या पुरेशा जनजागृती अभावी अनेक रुग्णांना तातडीने रक्तपुरवठा होत नाही, जिल्ह्यासह जिल्ह्याबाहेरील रक्तपेढ्यामध्ये कायम रक्ताचा तुटवडा असतो. त्यामुळे रक्तदान ही लोकचळवळ व्हावी या उद्देशाने संदीप शेळके यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने रक्तदानाचा महायज्ञ हा उपक्रम राबवित असल्याचे वन बुलडाणा मिशनचे जिल्हा कार्यालय प्रमुख गोविंद येवले यांनी सांगितले

# तत्काळ पंचनामे करून नुकसान भरपाई द्या -अतुल भुसारी पाटील

जनसंचलन/ सिंदखेडराजा



भारत हा कृषी प्रधान देश असुन आज मात्र ह्या कृषी प्रधान देशातील अन्नदाता शेतकऱ्यांवरच उपासमारीची वेळ आली आहे, कधी अस्मानी संकट तर कधी सुलतानी संकट आणि सरकारची शेतकऱ्यांविषयी ची असलेली अनास्था व सरकारच्या नाकर्तेपणा मुळे शेतकरी व शेतमजूर हवालदिल झाला असून प्रत्येक वेळी हातातोंडाशी आलेला घास निसर्ग हिरावून घेत आहे सोमवारी बुलढाणा जिल्हात वादळवाऱ्यासह झालेल्या गारपीटामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले असून बुलढाणा जिल्हा आयोजित केलेली आढावा बैठक रद्द करून तत्काळ शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचले शेतकऱ्यांच्या शेतातील गहु, हरभरा, कांदा या रब्बी पिकांसह फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे ज्वारी गहु तर पुर्णपणे आडवा झाल्याचे दिसून आला असुन आणि विकण्यासाठी तयार झालेला संत्राही गळुन पडला आहे या नुकसानीची अतुल भाऊ भुसारी पाटील यांनी पाहणी करून सरकारने तत्काळ पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याची मागणी केली. मागील विधानसभेत सरकारने शेतकऱ्यांवर अन्याय न करता सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले होते पण आजही बुलढाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांना योग्य ती मदत मिळाली नाही पण यावेळी अधिकाऱ्यांनी जर चुकीचे व निरंक अहवाल सादर केले आणि मदत नाही मिळाली तर प्रसंगी राष्ट्रीय समाज पक्ष जिल्हाधिकारी कार्यालया समोर ठिय्या आंदोलन करेल असा इशारा अतुल भाऊ भुसारी पाटील यांनी दिला आहे यावेळी अतुल भाऊ भुसारी पाटील यांनी नुकसानग्रस्त शेतक-यांशी चर्चा करुन नुकसानीची माहिती घेतली राष्ट्रीय समाज पक्ष शेतकऱ्यांच्या पाठिशी असुन शेतकऱ्यांनी सुध्दा नाउमेद न होता टोकाचे कोणतेही पाऊल न उचलण्याचे आवाहन केले

# मतदारांमध्ये विश्वास निर्माण होण्यासाठी कठोर निर्णय घ्यावेत-जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील




**जनसंचलन/बुलढाणा**

आगामी काळात लोकसभा निवडणूक भयमुक्त वातावरणात पार पडणे आवश्यक आहे. यात पोलिस विभागाची भूमिका महत्वाची राहणार आहे. मतदारांमध्ये विश्वास निर्माण होण्यासाठी पावले उचलावीत, तसेच कठोर निर्णय घ्यावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले. लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने संबंधित पोलिस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण आज नियोजन सभागृहात पार पडले. यावेळी निव-ासी उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार, उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुहासिनी गोणेवार, उपजिल्हाधिकारी शरद पाटील, उपविभागीय अधिकारी डॉ. रामेश्वर पुरी, समाधान गायकवाड, अतिरिक्त पोलिस अधीक्षक बी. महामुनी, जिल्हा सूचना अधिकारी सुनील खुळे उपस्थित होते. जिल्हाधिकारी डॉ. पाटील म्हणाले, येत्या काळात निवडणूक विषयक कार्यवाही प्राधान्याचा विषय असणार आहे. निवडणूक कामकाजात विविध ॲपचा उपयोग होणार आहे. त्या अनुषंगाने याबाबतची माहिती यासंबंधित प्रत्येकाला असणे आवश्यक आहे. या ॲपच्या माध्यमातून एकत्रित करण्यात आलेली माहिती ही निवडणूक आयोगाला दिसणार आहे. त्यामुळे यात गांभीर्याने कामकाज करणे आवश्यक आहे. तसेच पथकाकडून केलेल्या कारवाईची माहिती अचूकपणे समाविष्ट करणे गरजेचे आहे. यात कोणत्याही प्रकारे निष्काळजीपणा करण्यात येऊ नये. फिरत्या पथकाच्या प्रमुखाला दंडाधिकाऱ्याचा दर्जा देण्यात आला आहे. त्यामुळे विविध कारवाई करताना सोयीचे होणार आहे. सी-व्हीजीलच्या माध्यमातून नागरिक आचारसंहिता भंगबाबत तक्रारी करू शकणार आहे. यावर आलेल्या तक्रारीवर फिरत्या पथकाने तात्काळ कार्यवाही करावी. तसेच तपासणी पथकाने गांजा, अवैध दारू किंवा इतर बाबतीत जप्तीची कार्यवाही करावी. बँकांनी रोख रक्कम वाहतूक करण्यासाठी योग्य ती काळजी घ्यावी. संपूर्ण निवडणूक कालावधीत कायदा व सुव्यवस्थेची कोणतीही परिस्थिती उद्भवू नये यासाठी दक्ष राहावे. निवडणूक प्रक्रियेत ईव्हीएम ही अत्यंत संवेदनशील आहे. याबाबत कोणतीही तडजोड करू नये. ईव्हीएमबाबत आलेल्या प्रत्येक सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

# खळबळजनक घटना अल्पवयीन मुलावर अनैसर्गिक अत्याचार!



**जनसंचलन/बुलडाणा**

येथील चिखली रोड जवळील बालकांच्या शासकीय निरीक्षणगृहामध्ये एका अल्पवयीन मुलाने दहा वर्षीय मुलावर नैसर्गिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी २६ फेब्रुवारी रोजी बुलढाणा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बाल निरीक्षणगृहाचे अधीक्षक एम.एम. अश्टेकर यांनी याप्रकरणी तक्रार दिली. घटना १७ फेब्रुवारी ची आहे. बालगृहातील एका सोळा वर्षीय मुलाने दहा वर्षाच्या मुलासोबत दुष्कृत्य केल्याचे तक्रारीत म्हटले आहे. प्राप्त तक्रारीनुसार बुलढाणा पोलिसांनी कायद्यांतर्गत विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. प्रकरणाचा पुढील तपास ठाणेदार नरेंद्र ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली एपीआय निलेश लोधी करीत आहेत.

